महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ २३ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३२४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

## शहापूर मुरबाड तालुक्यातील
# आठ तलाव झाले गाळमुक्त

**गाळमुक्त धारण, गाळमुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून पाझर तलावामुळे भूगर्भातील पाण्याची पातळीवर येण्यास मदत होणार आहे. त्यामुळे विहिरींच्या पाणी पातळीसह सिंचन क्षेत्रात वाढ होणे, हातपंप, कुंपनलिका, कपडे धुण्यासह दैनंदिन कामांसाठी होणार आहे. यंदा आठ तलावांतील गाव व पाझर तलावातून २९ हजार क्युबिक मीटर गाळ काढण्यात आल्याची माहिती ठाणे जिल्हा परिषदेचे लघु पाटबंधारे कार्यकारी अभियंता दिलीप जोकर यांनी दिली. त्यामुळे तितकाच पाणीसाठा निर्माण होणार आहे.**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

**ठाणे, ता. २२ :** जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाने जिल्ह्यातील जलस्रोतांचे बळकटीकरण करण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार शहापूर आणि मुरबाड तालुक्यातील आठ गाव व पाझर तलावांमधून तब्बल २९ हजार क्युबिक मीटर गाळ काढला आहे. त्यामुळे या गाव व पाझर तलावात २९ हजार क्युबिक मीटर पाणीसाठा निर्माण होणार आहे. तसेच येत्या काही महिन्यांत आणखी ३४ तलावांतीलदेखील गाळ काढण्यात येणार आहे. मुंबई आणि ठाण्याची तहान भागवणारे मोठी धरणे जिल्ह्यात आहेत. ठाणे जिल्ह्यात वर्षानुवर्षे पाणीटंचाई आणि नापिकीच्या झळा शहापूर, मुरबाड, कल्याण, भिवंडी आणि अंबरनाथ तालुक्यातील अतिदुर्गम भागातील गाव-पाड्यांना सोसाव्या लागत होत्या. या परिसरात उन्हाळ्याच्या काळात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे; मात्र टँकरने करण्यात आलेला पाणीपुरवठादेखील पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे या गावाची पाण्याची तहानदेखील भागत नाही.

यंदा चांगला पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जलस्रोतांच्या बळकटीकरणासाठी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनांची कामे हाती घेण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाने केल्या. त्यानुसार यंदाच्या वर्षी जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली शहापूर, मुरबाड, कल्याण, भिवंडी आणि अंबरनाथ तालुक्यातील ५० गाव तलाव आणि पाझर तलावातील गाळ काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार यापूर्वी सहा तलावांतून २१ हजार क्युबिक गाळ काढण्यात आला आहे, तर यंदा शहापूर आणि मुरबाड तालुक्यातील १० तलावांतील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले. त्यापैकी आठ तलावांतून २९ हजार क्युबिक गाळ काढण्यात आला आहे, तर दोन ठिकाणी गाळ काढण्याचे कामदेखील सुरू केल्याची माहिती लघु पाटबंधारे विभागाने दिली.

## अकरावी प्रवेशाची वेबसाईट चार दिवस बंदच राहणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील उच्च माध्यमिक बोर्डाकडून 11 वीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा गोंधळ संपता संपेना झालाय. शिक्षण संचालनालयाकडून अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी आता नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. त्यानुसार, अकरावीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश 26 मे पासून सुरू होणार असून पहिली फेरी प्रत्यक्षात तेव्हाच सुरू होईल. त्यामुळे, गेल्या 2 दिवसांपासून ऑनलाईन प्रवेशासाठी धडपड करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी 4 दिवस थांबावे लागणार आहे. 21 मे रोजी बुधवारी प्रत्यक्षात सुरू होणारी ऑनलाइन अकरावी (SSC results) प्रवेशाची प्रक्रिया वेबसाईट मधील तांत्रिक अडचणीमुळे सुरू होऊ शकली नाही. त्यानंतर, आता महाराष्ट्र शिक्षण महामंडळाकडून 26 मे ही नवी तारीख देण्यात आली असून 26 मे ते 3 जूनपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश घेता येईल. राज्य शिक्षण महामंडळाने दिलेल्या नव्या वेळापत्रकानुसार, 26 मे ते 3 जूनपर्यंत म्हणजे 9 दिवस 11 वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे. त्यानंतर, 5 जून रोजी पहिली जनरल मेरीट लिस्ट लागणार आहे. 6 ते 7 तारखेपर्यंत विद्यार्थ्यांना आपल्या हरकती नोंदवून तक्रार करता येईल. त्यानंतर, 8 जून रोजी अंतिम जनरल मेरीट लिस्ट जाहीर होईल.




## लाचखोर शिधावाटप निरीक्षकाला अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २२ :** शिधावाटप दुकानावर कारवाई न करण्यासाठी दरमहा दोन हजार रुपयांप्रमाणे सहा महिन्यांचे १२ हजार रुपये असे चार दुकानदारांकडून ४८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना मुंबई कार्यालयाचे शिधावाटप निरीक्षक सागर साहेबराव वराळे यांना कळवा येथे ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले. याप्रकरणी कळवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, गुरुवारी (ता. २२) ठाणे न्यायालयाने वराळे यांना २४ मेपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## रेतीमाफियांमुळे सिडकोचे नऊ कोटी पाण्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खारघर, ता. २२ (बातमीदार):** खारघर डोंगरातून वाहून जाणारे पाणी अडवून त्या पाण्याची साठवणूक करून सेंट्रल पार्क आणि गोल्फ कोर्ससाठी उपयोग करता येईल, हा उद्देश समोर ठेवून सिडकोने गोल्फ कोर्सच्या बाजूला साडेचार हेक्टर जमिनीवर नऊ कोटी रुपये खर्च करून तलाव उभारले होते; मात्र या तलावाचा दुरुपयोग होत असून रेतीमाफिया येथे रेती धुण्याचे काम करत आहेत. त्यामुळे सिडकोचे नऊ कोटी पाण्यात गेल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

## शेतकऱ्यांच्या कष्टावर पाणी
### दोनशे शेतकऱ्यांच्या भाताचे पैसे रखडले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कासा, ता. २२ (बातमीदार) :** पावसाळ्याच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर डहाणू, जव्हार, मोखाडा परिसरातील शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या प्रादेशिक जव्हार कार्यालयांतर्गत भात विक्री केलेल्या सुमारे २०० शेतकऱ्यांचे पैसे दोन महिन्यांपासून रखडले आहेत. त्यामुळे आगामी शेती हंगामाची तयारी अडचणीत आली आहे. जव्हार, मोखाडा, कासा, मनोर या परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी आपल्या घामाच्या थेंबांनी पिकवलेल्या भाताची विक्री महामंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालयाला केली, मात्र दोन महिने उलटून गेले तरी शेतकऱ्यांच्या खात्यात एकाही रुपयाचा भरणा झालेला नाही. त्यामुळे बी-बियाणे, खते, शेतीसाठी लागणारे साहित्य यासाठी भांडवल उभे करण्याचा प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे.

### मुरबाड तहसील कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने
## सौ. कमलताई किसन कथोरे महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप शिबीर





**आमदार किसन कथोरे यांच्या शुभ हस्ते विद्यार्थ्यांना दाखले वाटप**

**मुरबाडचे तहसीलदार अभिजित देशमुख यांच्या शुभहस्ते शिबिराचे उद्घाटन**

**५५० विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या दाखल्यांचे वाटप**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील विध्यार्थ्यांना एकाच वेळी शालेय प्रवेशाचे दाखले एकाच वेळी सर्व प्रकारचे दाखले मिळावेत यासाठी सौ कमलताई किसन कथोरे महाविद्यालय म्हसा व मुरबाड तहसीलदार कार्यालय यांच्या सयुक्त विध्यमाने दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 550 विध्यार्थ्यां नी सहभाग घेऊन दाखले काढुण घेण्यात आले. आमदार किसन कथोरे च्या हस्ते दाखले देण्यात आले.

दिनांक २२ मे २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये शासकीय दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना एका छताखाली शैक्षणिक कामकाजासाठी आवश्यक सर्व दाखले उपलब्ध झाले. मुरबाड तालुक्याचे सन्माननीय आमदार श्री. किसनजी कथोरे साहेब यांच्या शुभ हस्ते दाखले वाटप करण्यात आले. शासकीय दाखले वाटप शिबिराचे उद्घाटन मुरबाड तालुक्याचे तहसीलदार आदरणीय श्री. अभिजितजी देशमुख साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच नायब तहसिलदार श्री. शिंदे साहेब व इतर सर्व शासकीय अधिकारी वर्ग महाविद्यालयात शिबिरासाठी उपस्थित होते. परिसरातील सर्व नागरिक व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून एकूण ५१३ दाखले शिबिरात तयार करण्यात आले.

## ठाण्यात तीन कोरोना रुग्ण
### आरोग्य विभाग सतर्क



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** पाच वर्षांपुर्वी सर्वत्र थैमान घातलेल्या करोना विषाणूचा प्रादुर्भाव गेल्या तीन वर्षांपूर्वी आटोक्यात येऊन रुग्ण संख्या शुन्यावर आल्याचे चित्र असतानाच, ठाणे महापालिका क्षेत्रात करोनाचे तीन रुग्ण गेल्या दोन दिवसांत आढळून आल्याने आरोग्य विभाग सर्तक झाला आहे. या रुग्णांसाठी पालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात १९ खांटांचा स्वतंत्र कक्ष उभारण्यात आलेला आहे.

पाच वर्षांपूर्वी म्हणजेच २०२० मध्ये संपुर्ण जगभरात करोना विषाणूचा उद्रेक झाला होता. देशासह राज्यात आणि ठाण्यात करोना रुग्ण संख्येत झपाट्याने वाढ होत होती. रुग्ण उपचारासाठी रुग्णालयात पुरेशा खाटा उपलब्ध होत नव्हत्या. करोनामुळे अनेक रुग्णांचा मृत्यु झाला होता. या विषाणूमुळे सर्वांच्या मनात धडकी भरवली होती. संपूर्ण देशात टाळेबंदी लागू करण्यात आली होती. या काळात अनेकांच्या नोकरी आणि व्यवसायावर परिणाम झाला. तीन वर्षांपुर्वी करोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आला आणि करोना रुग्ण संख्या शुन्यावर येऊन परिस्थिती रुळावर आली. यानंतर शहरातील जनजीवन पुन्हा पुर्वपदावर येऊन सुरळीतपणे सुरू असतानाच, दोन वर्षानंतर ठाणे महापालिका क्षेत्रात करोनाचे तीन रुग्ण गेल्या दोन दिवसांत आढळून आले आहेत. या तिन्ही रुग्णांना सौम्य लक्षणे असून ते घरीच उपचार घेत आहेत. असे असले तरी अचानकपणे तीन रुग्ण आढळून आल्याने आरोग्य विभाग सर्तक झाला आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात करोनाचे तीन रुग्ण आढळून आले असून त्यांना सौम्य लक्षणे आहेत. हे रुग्ण घरीच उपचार घेत आहेत. पालिकेच्या आरोग्य केंद्रात करोना संशयित रुग्णांची अँटीजन चाचणी करण्यात येत आहे. तसेच खासगी रुग्णांनाही अशी चाचणी करण्याचे आणि रुग्ण आढळल्यास त्याची माहिती देण्याची सुचना देण्यात आली आहे. पालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात १९ खांटांचा स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला असून त्यात १५ प्राणवायुच्या तर, ४ साध्या खाटा आहेत, अशी माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आली. या संदर्भात ठाणे महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या वृत्तास दुजोरा दिला.

## उल्हासनगरतील खोदकामे तत्काळ थांबवा
### आयुक्त मनीषा आव्हाळे यांचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. २२ :** अवकाळी पावसामुळे शहरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भुयारी गटार योजनेच्या नावाखाली सुरू असलेल्या बेफिकीर खोदकामांमुळे रस्त्यांची चाळण झाल्याने अपघातांचे सत्र सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर उल्हासनगर महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी निर्णायक पाऊल उचलत, शहरातील सर्व सुरू असलेली रस्त्यांची खोदकामे तत्काळ थांबवण्याचे आदेश दिले आहेत. याचबरोबर जे रस्ते आतापर्यंत खोदलेले आहेत, त्यांची कामे पूर्ण करून त्वरित दर्जेदार डागडुजी करण्याचे स्पष्ट निर्देशही अधिकाऱ्यांना व ठेकेदारांना दिले आहेत.

उल्हासनगर शहरात सध्या ईगल कंपनीकडून भुयारी गटार योजनेअंतर्गत अनेक भागांत रस्ते खोदले आहेत. पावसाळ्यापूर्वीच ही कामे अपूर्ण स्थितीत ठेवल्याने नागरिकांचे आरोग्य आणि जीव धोक्यात आला आहे. या अपघातजन्य परिस्थिती विरोधात नागरिकांनी थेट महापालिका प्रशासनाकडे धाव घेत ठेकेदार व सल्लागारांवर कारवाईची मागणी निवेदनाद्वारे केली. ठेकेदाराच्या निष्काळजीमुळे शहरात अपघात घडत आहेत आणि प्रशासन किंवा कंपनीकडून कुठलीही जबाबदारी घेतली जात नाही, अशी तक्रार नागरिकांनी दिलेल्या निवेदनात केली होती. आतापर्यंत जे रस्ते खोदलेले आहेत, त्यांची डागडुजी निकृष्ट दर्जाने झाली आहे. त्यामुळे या सर्व कामांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी आणि दोषींवर आर्थिक दंडासह कडक कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, आयुक्तांनी नागरिकांच्या भावना ओळखून तातडीने बैठक घेऊन अधिकारी आणि ठेकेदाराला स्पष्ट सूचना दिल्या आहेत. शहरात आता सध्या नव्याने कोणतेही रस्ते खोदले जाणार नाहीत. आधीच खोदलेल्या रस्त्यांची कामे जलद गतीने पूर्ण करून त्यांची दर्जेदार डागडुजी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.







## परिवहन विभागाच्या जागा विकसित होणार
### – प्रताप सरनाईक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुंबई - परिवहन विभागाच्या राज्यभरात असलेल्या ४३ जागांपैकी मुंबईतील ४ मोक्याच्या जागा अनाधिकृत रित्या बळकावण्यात आलेले आहेत. तसेच १५ ठिकाणी परिवहन कार्यालय ही भाड्याच्या जागेत आहेत. अशा परिस्थितीमध्ये भविष्यात उर्वरित जागा देखील गिळंकृत होऊ नयेत, यासाठी परिवहन विभागाने या जागांचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. ते परिवहन विभागाच्या आढावा बैठकीत त्यांनी तशा सूचना केल्या.

मंत्री पुढे म्हणाले की, मोटार परिवहन विभागाकडील सर्व ४३ जागांची माहिती अद्यावत करून या जागांची सद्य स्थिती, जागेचा ७/१२, ८- अ यासह अन्य अनुषंगिक कागदपत्रे तयार करून याची माहिती परिवहन आयुक्त कार्यालयास सादर करावी. जिथे अतिक्रमण झाले आहे, त्या ठिकाणी ते दूर करण्यासाठी कायदेशीर प्रयत्न करावेत.

मुंबईतील घाटकोपर येथील रमाबाई नगर येथील ७ एकर जमीन, वडाळा, जुहू व अंधेरी येथील जमीनी अनाधिकृत रित्या अतिक्रमण करून झोपडपट्टी धारकांनी गिळंकृत केल्या आहेत. याकडे गेले कित्येक वर्षांमध्ये परिवहन विभागाचे लक्ष गेले नाही हे दुर्दैवी आहे. यापुढे अशाप्रकारे जमिनी हडप केला जाऊ नयेत यासाठी परिवहन विभागाने कुंपण घालून घ्यावे व लवकरात लवकर सदर जमिनी विकास करण्याचा आराखडा तयार करावा असे निर्देश या बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.



# गीतासार



## अध्याय ११
## विश्वरूपदर्शनयोगः

सञ्जय उवाच एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य कृताञ्जलिर्वेपमानः किरीटी। नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ॥ ११-३५ ॥

संजय म्हणाले, भगवान केशवांचे हे बोलणे ऐकून किरीटी अर्जुनाने हात जोडून कापत कापत नमस्कार केला आणि फिरूनही अत्यंत भयभीत होऊन प्रणाम करून भगवान श्रीकृष्णांना सद्गदित होऊन तो म्हणाला ॥ ११-३५ ॥

अर्जुन उवाच स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च। रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति सर्वे नमस्यन्ति च सिद्धसङ्घाः ॥ ११-३६ ॥

अर्जुन म्हणाला, हे अंतर्यामी श्रीकृष्णा, आपले नाव, गुण आणि प्रभाव यांच्या वर्णनाने जग अतिशय आनंदित होते व तुमच्यावर अतिशय प्रेम करू लागते. तसेच भ्यालेले राक्षस दिशादिशांत पळून जात आहेत आणि सर्व सिद्धगणांचे समुदाय आपल्याला नमस्कार करीत आहेत, हे योग्यच होय. ॥ ११-३६ ॥

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे। अनन्त देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ ११-३७ ॥

हे महात्मन, ब्रह्मदेवाचेही आदिकारण आणि सर्वात श्रेष्ठ अशा आपल्याला हे नमस्कार का बरे करणार नाहीत? कारण हे अनंता, हे देवाधिदेवा, हे जगन्निवासा, जे सत, असत व त्यापलीकडील अक्षर अर्थात सच्चिदानंदघन ब्रह्म आहे, ते आपणच आहात. ॥ ११-३७ ॥

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम्। वेत्तासि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनन्तरूप ॥ ११-३८ ॥

आपण आदिदेव आणि सनातन पुरुष आहात. आपण या जगाचे परम आश्रयस्थान आहात. जग जाणणारेही आपणच व जाणण्याजोगेही आपणच आहात. परम धामही आपणच आहात. हे अनंतरूपा, आपण हे सर्व विश्व व्यापले आहे. ॥ ११-३८ ॥

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च। नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥ ११-३९ ॥

आपण वायू, यमराज, अग्नी, वरुण, चंद्र, प्रजेचे स्वामी ब्रह्मदेव आणि ब्रह्मदेवाचेही जनक आहात. आपल्याला हजार वेळा नमस्कार नमस्कार असो. आपणाला आणखीही वारंवार नमस्कार नमस्कार असोत. ॥ ११-३९ ॥

## रेसिपी
## रताळ्याचा शिरा



साहित्य-
रताळे 2 मोठ्या आकाराचे
दूध एक कप
तूप 1/4
वेलची पूड 1/4
साखर
मेवे

कृती-
रताळे वाफवून घ्यावे. थंड झाल्यानंतर साल काढून मॅश करून घ्यावे. आता पॅनमध्ये तूप गरम करून त्यामध्ये मॅश केले रताळे घालावे. तसेच थोडयावेळाने दूध घालावे. व शिजू द्यावे. मग त्यामध्ये साखर घालून मेवे घालावे. व गरमागरम सर्व्ह करावा.



# जागतिक कासव दिन

लेखक: श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप मानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे. आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे. कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उदेश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

# विकलांग डब्यात अपंगांव्यतिरिक्त प्रवास करणाऱ्यांवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : रेल्वे प्रशासनाने रेल्वे गाडीत विकलांकरता राखीव डबा ठेवला आहे. मात्र इतर डब्यात गर्दीचे कारण पुढे करत सामान्य प्रवाशी विकलांगच्या डब्यात प्रवास करतात. डोंबिवली रेल्वे पोलीसांनी अशा प्रवाशांवर कारवाई सुरु केली आहे. काल बुधवारी 21 तारखेला साडे पाच ते सात यावेळेत पोलीसांनी कारवाई करत डोंबिवली रेल्वे स्टेशन येथे लोकल ट्रेन मधील विकलांग डब्यात अनधिकृतपणे प्रवास करणाऱ्या 34 प्रवशांवर डोंबिवली रेल्वे पोलीस ठाणे व रेल्वे सुरक्षा बल (डोंबिवली) असे संयुक्तपणे कारवाई करण्यात आली. या कारवाईत डोंबिवली रेल्वे पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे, दोन अधिकारी, 20 अंमलदार तसेच रेल्वे सुरक्षा बल यांचे दोन अधिकारी व पाच अंमलदार हजर होते. डोंबिवली रेल्वे पोलीस स्टेशन अंतर्गत जानेवारी 2025 ते मे अखेरीस दिव्यांग डब्यामध्ये प्रवास करणाऱ्या 198 अनधिकृत प्रवाशांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे यांनी दिली.

## प्लास्टिक मुक्तीसाठी
# ठाणे जिल्हा परिषदेची महत्त्वाकांक्षी मोहीम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : केंद्र व राज्य शासनाच्या पर्यावरण आणि स्वच्छतेविषयक मार्गदर्शक सूचनांनुसार, जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत ग्रामीण भागात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत "प्लास्टिक मुक्त ग्राम" अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. २२ मे ते ५ जून, २०२५ या कालावधीत विविध उपक्रम राबवून ही मोहिम जनजागृतीपूर्वक पार पाडण्यात येणार आहेत.

या अभियानाचा शुभारंभ पर्यावरण शपथ घेऊन करण्यात येणार असून, ग्रामस्थांना अभियानात सक्रिय सहभागासाठी जिल्हा परिषदेमार्फत आवाहन करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे म्हणाल्या की, "प्लास्टिक मुक्त गावांची संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी ग्रामपातळीवर सामूहिक कृती गरजेची आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने सहभागी होणे आवश्यक आहे. ही मोहीम केवळ एक उपक्रम न राहता, "प्लास्टिक मुक्त ग्राम" करण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध आहे."

ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रमुख प्रमोद काळे यांनी सांगितले की, "या मोहिमेंतर्गत प्लास्टिकमुक्तीसाठी विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. विशेषतः 'मासिक पाळी व्यवस्थापन दिन', 'थीम एक पृथ्वी, एक आरोग्य' या उपक्रमांद्वारे शाळा, अंगणवाड्या, आरोग्य केंद्रे यामधून महिलांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती करण्यात येणार आहे. माध्यमांद्वारे आणि स्थानिक सहभागातून या मोहिमेचा मोठा प्रभाव पडेल, असा विश्वास आहे."


अभियानाचे ठळक वैशिष्ट्ये:

- २२ मे २०२५: पर्यावरण शपथ व जनजागृती रॅली
- २८ मे २०२५: मासिक पाळी व्यवस्थापन दिन - शाळांमधून किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन
- २९ मे २०२५: 'थीम एक पृथ्वी, एक आरोग्य' दिन - योग दिनानिमित्त आरोग्य विषयक उपक्रम
- ग्रामसभा, रॅली, प्रदर्शन, महिला बचत गट, युवक मंडळे यांच्या सहभागातून विविध सर्जनशील उपक्रम

उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक व स्थानिक स्वच्छता समिती यांच्या समन्वयाने ही मोहीम यशस्वी करण्यात येणार आहे.

## ठेकेदार आणि बांधकाम खात्याच्या अनास्थेमुळे
# रस्त्याअभावी आदिवासी नागरिकांचे हाल





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील अनेक आदिवासी वाड्या अजूनही चांगल्या रस्त्यापासुन वंचित आहेत. तालुक्यातील वाक्रुळ ग्रामपंचायत हद्दीतील मख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत मंजूर झालेला रस्ता राष्ट्रीय मार्ग ८८ ते फणसवाडी रस्ता आणि नाडे, आघाई ते भोगेश्वर रस्त्याचे सिमेंट काँक्रेटिकरण आणि रुंदीकरणासाठी दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी कामाचा कार्यारंभ आदेश निघाला होता मात्र ५ महिने उलटूनही कोणत्याही प्रकारचे काम या रस्त्याचे संबंधित ठेकेदाराने सुरु केले नसल्याने आणि १२ किलोमीटरचा मार्ग ठेकेदाराने खोदून ठेवला असल्याने येथील नागरिकांना खड्डेमय रस्त्यावरून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या रस्त्यामुळे राजमाल (नाईकवाडी), म्हेसकोंड (पानेड), जांभळयाची वाडी, खरबाची वाडी, नाडे, निंबारवाडी, फणसवाडी, राजमाती, काटीचीवाडी आणि भोगेश्वर आदी ११ आदिवासी गावे आणि ३ हजार लोकसंख्या या रस्त्यामुळे पेण शहराला जोडले जातात. मात्र ठेकेदार आणि बाधकाम विभागाच्या अनास्थेमुळे हा रस्ता खड्डयात हरवला आहे. सध्या पावसाचे दिवस जवळ आले आहेत आणि ठेकेदाराणे रस्ता खोदून ठेवला असल्याने येथील आदिवासी नागरिकांनकडून प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित अधिकारी आणि ठेकेदाराने लवकर या रस्त्याचे काम सुरु करावें अन्यथा येणाऱ्या काही दिवसात आंदोलन करण्याच्या तयारीत येथील नागरिक आहेत.

# कावेरी चौकात अनधिकृत फेरीवाल्यांचे बस्तान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली : एमआयडीसी निवासी, कावेरी चौक परिसरात अनधिकृत स्टॉलधारक फेरीवाले ठाण मांडून आहेत. या फेरीवाल्यांकडे खरेदीसाठी येणारे गिऱ्हाईक आपली वाहने तेथे समोरच उभी करून ठेवीत ठेवतात. अशा प्रकाराने रस्त्यावर वर्दळव् होवून पुन्हा अपघात होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. पालिका प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करू नये अशी मागणी येथील नागरिक करीत आहेत.

याच कावेरी चौकात दोन शाळकरी मुलांना रस्त्यावर एका टेम्पोने ठोकर दिल्याने एका मुलाचा मृत्यू तर एकजण जखमी झाला होता. चौकात होणारी वर्दळ, तेथील बसणारे अनधिकृत स्टॉलधारक फेरीवाले होते. या फेरीवाल्यांकडे खरेदीसाठी येणारे गिऱ्हाईक आपली वाहने तेथे समोरच उभी करून ठेवीत असत. सदर अपघात नंतर जनक्षोभ होवून लोकांनी फेरीवाल्यांविरुद्ध आंदोलन केले होते. सर्वपक्षीय सामाजिक कार्यकर्त्यांनी या बाबत कल्याण डोंबिवली महापालिकेला पत्र देवून कावेरी चौकात फेरीवाल्यांवर कारवाई करण्याचे सांगितले होते.

महापालिकेच्या ई वॉर्ड कडून तशी कारवाई त्यावेळी करण्यात आली होती. त्यामुळे गेले सात महिने कावेरी चौकात फेरीवाले बसत नव्हते. मात्र पुन्हा काही दिवसांपासून काही फेरीवाले तेथे दिसून येत आहेत. कावेरी चौक हा निवासी मधील महत्त्वाच्या असा गजबजलेला परिसर आहे. सदर परिसरात मोठी दुकाने, शाळा, रुग्णालये इत्यादी असल्याने वाहतुक आणि लोकांची रेलचेल मोठ्या प्रमाणात असते. आता पुन्हा फेरीवाले बसल्याने ट्रॅफिक, अपघात ही समस्या होण्याची पुन्हा शक्यता आहे.

कल्याण डोंबिवली महापालिकेने यावर पुन्हा कडक कारवाई करून कावेरी चौक फेरीवाले मुक्त करावा अशी मागणी स्थानिक माजी नगरसेवक आणि शिवसेना उपतालुका प्रमुख भालचंद्र म्हात्रे, भाजप कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, शाखाप्रमुख सागर पाटील, सामाजिक कार्यकर्ते सत्यवान म्हात्रे आणि राजू नलावडे यांनी केली आहे. तसेच शिवसेना उपजिल्हा प्रमुख (कल्याण ग्रामीण) राहुल भगत यांनी ई वॉर्ड, कल्याण डोंबिवली महापालिका याना पत्र देवून एमआयडीसी कावेरी चौक येथील फेरीवाले हटविण्यात यावे अशी मागणी केली आहे.

# जयकुमार रिजवानी यांना पीएचडी पदवी प्रदान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



गोवेली: येथील जीवनदीप विधी महाविद्यालयातील प्र. प्राचार्य जयकुमार रिजवानी यांना छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठाकडून नुकतीच विधी विषयातून पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी 'सायबर गुन्ह्यांमध्ये सामाजिक अभियांत्रिकीची भूमिका आणि त्याचे प्रतिबंध: त्याच्या कायदेविषयक आणि न्यायिक ट्रेंडचे विश्लेषण' या विषयावर संशोधन कार्य केले होते. त्यांना मार्गदर्शक म्हणून डॉ. बी. डी. रावत आणि डॉ. मृत्युंजय पांडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री रवींद्र घोडविंदे, संचालक प्रशांत घोडविंदे, संचालिका सौ स्मिता घोडविंदे यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वादळी पावसामुळे घरावरील छप्पर उडून नुकसान
## पंचनाम्याचे काम पूर्ण!



भुवन सजा हद्दीतील काल झालेल्या वादळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करताना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यात सहा मे २०२५ पासून सतत अवकाळी पाऊस पडत आहे या अवकाऊ पावसामुळे मुरबाड तालुक्याला तिस-यादां जोरदार तडाखा बसला, जोरदार पावसामुळे २० मे २०२५ रोजी सायंकाळी चार वाजता तसेच रात्री सात वाजता तसेच दहाच्या दरम्यान जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस बरसला त्यामध्ये तालुक्यातील भादाने, भुवन सजा हद्दीतील शेलारी गाव यांच्यासह जवळपास ६१ घरावरील अशंत पत्रे /कौले, छप्पर, उडून नुकसान झाले आहे, झालेल्या नुकसानाची मुरबाड तहसील कार्यालय मार्फत तलाठी /सर्कल मंडळ, कर्मचारी यांनी यांनी तात्काळ पंचनामे केले आहेत. अंदाजे चार लाखाच्या पर्यंत नुकसान झाल्याची माहिती मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी दिली आहे.

# कल्याण पूर्वेत रस्त्यालगत कचऱ्याचे ढीग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : पूर्वेतील पूना लिंक रोड विजयनगर परिसरातील नूतन शाळा, सेंट ज्युडिस शाळेजवळ, प्रसाद हॉटेल संतोषी माता मंदिर बँकजवळ रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग आणि इतस्ततः पसरलेला कचरा संभाव्य रोगराईला करणीभूत ठरेल असे दिसत आहे. मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या सावळागोंधळ कारभारात कधी सुधारणा होणार असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे. कल्याण पूर्वेतील विजयनगर परिसरातील कचऱ्याचे ढीग आणि विखुरलेला कचरा पाहता शहर स्वच्छतेचे तीन तेरा वाजल्याचे दिसून येत आहे. या कचऱ्याच्या ढिगांमुळे दुर्गंधी पसरली असून हा कचरा रोगराईला निमंत्रण देऊ शकतो असे येथे फिरणाऱ्या माशा, डास यामुळे दिसून येत आहे. हा कचरा परिसरातील लोकांच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरु शकतो. कल्याण डोंबिवली मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कचऱ्याचे नियोजन शहर स्वच्छतेसाठी केले जाते. एकीकडे कचराकुंडीमुक्त शहर संकल्पना राबवली जात असून शहारातील अनेक ठिकाणी रस्त्यालगत कचरा टाकण्याचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. कल्याण पश्चिमेतील बारावे जलशुद्धीकरण केंद्रालगतच्या रस्त्यालगत कचऱ्याचे डीग नेहमीच दिसून येतात. याचा अर्थ घंटागाडीमार्फत संकलित केल्या जाणाऱ्या कचरा संकलनाचे गणित बिघडत असल्याचे कचऱ्याचे ढीग पाहता दिसून येते. रस्त्यालगत कचऱ्याचे ढीग आणि अस्वच्छता पाहता संदर्भीत परिसरात राहणाऱ्या स्थानिक रहिवासीयांसाठी तसेच शाळा परिसरातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची समस्या ठरला आहे. अवकाळी पावसाने हा कचरा ओलसर झाल्यास कचरा प्रदूषणामुळे संभाव्य साथीचे रोग आल्यास यास जबाबदार कोण? असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला OVER आहे. शहर स्वच्छता बाबत सामाजिक बांधिलकीचा वसा जोपसणारी कल्याण पूर्वेतील सहयोग सामाजिक संस्था पुढाकार घेत प्रशासनाला मदत करीत कचरा टाकला जाणाऱ्या ठिकाणी शिल्प तयार करुन जनजागृती करते. याच संस्थेचे अध्यक्ष विजय भोसले यांनी कल्याण पूर्वेतील कचऱ्याच्या ढिगाऱ्याबाबत कळवून देखील प्रशासनाने तो कचरा संकलन करुन स्वच्छता केली नाही. हे दुर्दैवच म्हणावे लागेल. कालच मोठा गाजावाजा करत प्रशासनाने शहर स्वच्छता, रस्ते स्वच्छता, कचरा संकलन करण्यासाठी शहरात 'चेन्नई पॅटर्न' लागू करुन शहर स्वच्छतेसाठी ठेकेदार नेमला असला तरी रस्त्यालगत विविध ठिकाणी दिसणाऱ्या कचऱ्याच्या ढिगाला प्रशासन कसा आळा घालणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.


news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.


# रिक्षा कृती समिती कल्याणची आरटीओ कार्यालयावर धडक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ऑटो रिक्षा चालक-मालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र यांचे अध्यक्ष शशांक राव, सरचिटणीस विलास भालेकर यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्यात ऑटो रिक्षा चालकांच्या मुळावर उठलेली बाईक टॅक्सी चालवण्याचा निर्णय मागे घेण्यात यावा, कल्याणकारी मंडळातील अस्पष्टता आणि असलेल्या त्रुटी दूर करण्यात याव्या, वाहतुकीचे नियम धाब्यावर बसून सुरू असलेली ई रिक्षाला नियमात आणण्यात यावे यासाठी आंदोलन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून कल्याण मध्ये रिक्षा टॅक्सी संघर्ष कृती समिती कल्याण च्या माध्यमाने निर्दशने करण्यात आली व नंतर कल्याण कृती समितीचे अध्यक्ष महेंद्र मिश्रा, कृती समितीचे कार्याध्यक्ष विल्सन काळपुंड, कृती समितीचे उपाध्यक्ष मोहन पाठारे, कृती समितीचे सचिव राहुल वारे व भाजपा वाहतूक संघटनेची महिला पदाधिकारी काजल पंजाबी, राजू बेग यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले. त्यावेळी संघर्ष सेना ऑटो रिक्षा युनियन, रिपब्लिकन रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटना, भाजपा वाहतूक संघटना, रयत वाहतूक संघटना यांचे असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.


जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
7775851123, 8108559566
9619188558

# बकरी ईदसाठी भिवंडी निजामपूर महापालिका प्रशासनाची तयारी पूर्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** येत्या 07 जून, 2025 ते 09 जून, 2025 या कालावधीत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बकरी ईद सण साजरा होणार असुन मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्देशीत केलेल्या कार्यप्रणालीनुसार केलेल्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आज मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका अधिकारी, पोलीस विभाग, पशु वैद्यकीय विभाग यांचे समवेत बैठक पार पडली.

या बैठकीमध्ये आयुक्तांनी बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, वाहन विभाग, आरोग्य विभाग, पशु वैद्यकीय अधिकारी आणि पोलीस विभाग यांचेशी संवाद साधुन त्यांचे स्तरावर करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला. मागील वर्षी महानगरपालिकेमध्ये 56 ठिकाणी तात्पुरते कुर्बानी केंद्र स्थापन करण्यास प्रभाग स्तरावरुन परवानगी देण्यात आली होती. यावर्षी देखील 56 ठिकाणी कुर्बानी होणे अपेक्षित आहे. तसेच, या 56 केंद्राकरिता 200 टेम्पो, 14 जेसीबी, 11 जीप, 3 क्रेन इतक्या वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच कुर्बानीनंतर तेथील भागाची स्वच्छता करण्याकरिता 25 पाण्याचे टँकरचे अधिग्रहण करण्यात आले आहे. तसेच, कुर्बानीपुर्वी जनावरांची तपासणी करण्याकरिता पशुवैद्यकीय विभागाकडून 96 पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्यात आले आहे, हे अधिकारी 06 जून रोजी शहरात दाखल होतील. सहायक पोलीस आयुक्त श्री. सचिन सांगळे यांनी कायदा व सुवस्थेच्या दृष्टीने त्यांचीही तयारी पुर्ण झाली असून, बकरी ईद पुर्वी शहरातील मौलाना व कसाई संघटना यांचेसोबत येत्या नजीकच्या काळात बैठक आयोजित करण्यात आली असल्याचे बैठकीदरम्यान नमुद केले.

# बोगस तिकीट तपासणीसाला अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कसारा :** लोकमान्य टिळक टर्मिनसहून सुटणाऱ्या कुशीनगर एक्सप्रेसमध्ये तिकीट तपासणीसारखा पेहराव करून एक बनावट तिकीट तपासणीस प्रवाशांची तिकिटे तपासत होता. ही बाब साध्या वेशात याच एक्सप्रेसमध्ये प्रवाशांची तिकिटे तपासणाऱ्या मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणीसाच्या निदर्शास आली. रेल्वेच्या तिकीट तपासणीसांनी बनावट तिकीट तपासणीची माहिती घेताच तो बनावट असल्याचे आढळले. रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी त्याला तात्काळ ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करून अटक केली.




रामप्रकाश रामजीवन मंडल (४०) असे अटक करण्यात आलेल्या बनावट तिकीट तपासणीसाचे नाव आहे. ते विरार येथील बोळींज भागातील टेलिकॉम एक्सचेंज जवळील मंडल इमारतीत राहतात. मध्य रेल्वेचे मुख्य तिकीट तपासणीस हरेश किसन दहिलकर (५३) यांनी बनावट तिकीट तपासणीसाविरुध्द कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

# केडीएमसीकडून अतिधोकादायक इमारतींवर निष्कासन कारवाईला सुरुवात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पावसाळी आपत्कालीन परिस्थितीत अतिधोकादायक/ धोकादायक इमारती कोसळून होणारी दुर्घटना टाळण्यासाठी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे निर्देशानुसार, ७/ह प्रभागाचे सहा. आयुक्त राजेश सावंत यांनी डोंबिवली (पश्चिम) गणेश नगर येथील रिक्षा स्टॅन्डच्या बाजूच्या तळ+2 मजली पुष्प छाया या अतिधोकादायक इमारतीच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई आज दिवसभरात केली.

सदर इमारतीमध्ये एका व्यक्तीचा रहिवास असल्याने, संबंधित व्यक्तीस रहिवास मुक्त



ह प्रभागातील अतिधोकादायक इमारतीचं निष्कासन

करुन संबंधित व्यक्तीचे भोगवटा प्रमाणपत्र तयार करण्यात आले आहे. ही इमारत सुमारे ४० वर्षे जुनी असून आज इमारतीचे बांधकाम पूर्णत: जमिनदोस्त करण्यात आले.सदर कारवाई उप अभियंता अजय महाजन, अनधिकृत बांधकाम विभागाचे अधिक्षक अरुण पाटील, फेरीवाला हटाव पथकाचे कर्मचारी यांच्या मदतीने आणि १ पोकलेन व ५ मजूर यांच्या सहाय्याने करण्यात आली.

# जीवनदीप महाविद्यालयात एकदिवसीय दाखले वाटप शिबिर संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** दि.22 मे 2025 रोजी जीवनदीप महाविद्यालय गोवेलीमध्ये जीवनदीप महाविद्यालय व कल्याण तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अंतर्गत भव्य दाखले वाटप शिबीर मोठ्या प्रतिसादाने संपन्न झाले. नागरिकांना व विद्यार्थ्यांना शैक्षणिक व शासकीय कामांसाठी लागणारे दाखले सहज आणि त्वरित उपलब्ध व्हावेत यासाठी मुरबाड मतदार संघाचे आमदार श्री किसनजी कथोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जीवनदीप महाविद्यालय गोवेलीमध्ये भव्य दाखले वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले.छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अंतर्गत सदर शिबीर आयोजित करण्यात आले होते. जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री रविंद्र घोडविंदे सर यांच्या पुढाकाराने आणि कल्याणचे उपविभागीय अधिकारी श्री विश्वास गुजर व कल्याणचे तहसीलदार श्री सचिन शेजाळ यांच्या सहकार्याने सदर शिबीर यशस्वी पार





पडले.उत्पनाचा दाखला, अधिवास दाखला, स्थानिक वास्तव्याचा दाखला व जेष्ठ नागरिक दाखला हे महत्त्वाचे दाखले काढण्याची सुविधा उपलब्ध होती.कल्याण तालुक्यातील नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी या शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.एकूण 469 नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी या शिबीराचा लाभ घेतला.याप्रसंगी मुरबाड मतदार संघाचे आमदार श्री किसन कथोरे साहेब, जीवनदीप शै संस्थेचे अध्यक्ष श्री रविंद्र घोडविंदे सर, भाजपा कल्याण ग्रामीणचे नवनियुक्त अध्यक्ष श्री शेखर लोणे, उपविभागीय अधिकारी श्री विश्वास गुजर, तहसीलदार श्री सचिन शेजाळ, नायब तहसीलदार श्री नितीन बोडके ,म्हारळच्या मंडळाधिकारी श्रीमती प्रिती घुडे, टिटवाळाचे मंडळाधिकारी श्री चेतन पष्टे ,नडगांवच्या मंडळाधिकारी श्रीमती दर्शना भावे ,सर्व तलाठी वर्ग,फळेगावचे माजी सरपंच श्री रविंद्र जाधव,जीवनदीप शै संस्थेचे संचालक श्री प्रशांत घोडविंदे,पत्रकार श्री संजय कांबळे,पत्रकार श्री विलास भोईर, प्राचार्य डॉ के. बी, प्राचार्य डॉ.अशोक वाघ कोरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री प्रकाश रोहणे , उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे,प्रा नरेश टेंभे उपस्थित होते.

# उरणच्या - मोरा - भाऊचा धक्का जलप्रवास महागणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** सोमवार (२६ मे) पासून उरणच्या मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का दरम्यानचा जलप्रवास २५ रुपयांनी महागणार आहे. पावसाळ्यात अनियमित जलप्रवासामुळे महाराष्ट्र मेरिटाईम मंडळाकडून मोरा ते मुंबईच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या प्रवासाकरिता प्रवाशांना एका फेरीसाठी ८० ऐवजी १०५ रुपये मोजावे लागणार आहेत. ही दरवाढ चार महिन्यांसाठी लागू राहणार असून १ सप्टेंबर पासून पुन्हा एकदा ८० रुपये दर करण्यात येणार

### करंजा ते रेवस मार्गावर भार

**मोरा ते मुंबई प्रमाणेच उरण ते अलिबाग दरम्यानच्या करंजा रेवस मधील जलसेवा पावसाळ्यात सुरू असते. त्यामुळे अलिबाग ते मुंबई असा प्रवास करणारे प्रवासी हे करंजा रेवस मार्गाने प्रवास करतात. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशात वाढ होत असल्याने या प्रवाशांचा भार वाढणार आहे.**

आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून उरणच्या मोरा ते मुंबई दरम्यानची जलवाहतूक पावसाळ्यातही सुरू असते. मुंबई ते अलिबाग दरम्यानची जलसेवा पावसाळ्यात बंद असते. अशा स्थितीतही समुद्रातील लाटांचा सामना करीत मोरा-मुंबई सेवा सुरू असते. उरण ते नेरुळ बेलापूर ही लोकल सेवा सुरू झाली आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवासी संख्या ही घटली आहे. या घटलेल्या प्रवासी संख्येचा फटका या विभागाला बसला आहे. असे असले तरी या मार्गाने परंपरागत प्रवास करणारे प्रवासी आहेत. त्यामुळे ही सेवा सुरू आहे. या सेवेसाठी मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी मोरा मुंबई जलमार्गासाठी २५ रुपयांची वाढ करण्यात आल्याची माहिती मोरा बंदर अधिकारी नितीन कोळी यांनी दिली.

# तरणतलावात बुडून आठ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :**अर्नाळा येथील एका रिसॉर्ट मधील तरणतलावात बुडून आठ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे. मंगळवारी सकाळच्या सुमारास ही घटना घडली. दिक्षांत हरिजन असे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा तरणतलावांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. वसई विरारच्या समुद्र किनार पट्टीवर मोठ्या संख्येने रिसॉर्ट उभे राहिले आहेत. सध्या उन्हाळयाच्या सुट्टया लागल्या असल्याने मोठ्या संख्येने पर्यटक या भागातील रिसॉर्ट मध्ये येऊ लागले आहेत. मंगळवारी मुंबईच्या गोरेगाव संतोष नगर येथे राहणारे व्यकंटेश हरिजन हे आपले कुटुंब आणि मित्रांसह विरार अर्नाळा येथील ड्रिमलॅण्ड रिसॉर्टमध्ये सहलीसाठी आले होते. सकाळी नाष्टा केल्यानंतर सर्वजण रिसॉर्टच्या जलतरण तलावात उतरले. त्यावेळी त्यांचा मुलगा दिक्षांत हरिजन हा लहान मुलांसाठी असलेल्या जलतरण तलावातील पाण्यात खेळत होता. खेळता खेळता तो पाण्यात बुडाला त्याच्या नाकातोंडात पाणी गेल्याने त्याला श्वास गुदमरला. तातडीने त्याला पाण्यातून बाहेर काढून खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# कल्याण पूर्वेतील सप्तश्रृंगी इमारत दुर्घटना रहिवाशांकडून पुनर्वसनाची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील सप्तशृंगी इमारत दुर्घटना प्रकरणातील रहिवाशांनी केडीएमसी मुख्यल्यावर धडक देत पुनर्वसनाची मागणी केली.

कल्याण पूर्वेतील चिकणीपाडा सप्तशृंगी इमरतीचा स्लॅब कोसळल्याच्या दुर्घटनेत 6जणांचा दुर्दैवी मृत्यू तर सहा जण जखमी झाल्याची घटना मंगळवारी घडली. प्रशासनाने मदतकार्य करीत रहिवाशांना तात्पुरती राहण्यासाठी व्यवस्था नतून ज्ञानमंदिर शाळेमध्ये केली असली तरी इमारत स्लॅब दुर्घटना घटनेत बाधित रहिवाशांचे संसार साहित्य होत्या चे नव्हते झाले.

तर काहींच्या कुटुंबातील सदस्यांचा मृत्यूचा आघात झेलित दुखःला सामोरे जाण्याची वेळ आली आहे. दुर्घटनेमुळे बेघर झालेल्याची व्यवस्था शाळे मध्ये प्रशासनाने केली असली तरी. डोळयादेखत, पोटमारून पै पै करून




उभरलेला संसार सहित्य देखील मलब्याखाली गेले. दोन दिवसानंतर प्रशासन पाच दहा मिनिटात आपले महत्वाचे साहित्य काढण्याची मुभा दिली. यात शोधणार काय?सापडणार काय अशी अवस्था झाल्याचे रेखा किरण पाठारे यांनी प्रसिद्धी माध्यामांना समोर सांगितले. इमारती मधील दुर्घटना बळी पडलेल्याच्या मृत्यू पावलेल्या कुटुंबामध्ये आजचा तिसर्याचा कार्यक्रम विधी असताना दुखःचा डोंगर कोसळला असताना इमारती मधील रहिवाशांना आपला संसार सावारयाचा कसा असा प्रश्न पडला आहे.

शाळेमधील तात्पुरती सोय ही शाळा सुरू होण्याअधी कधीही बंद होऊ शकते. तातडीने आम्ही जायचं कुठे आणि संसार सहित्यासह घराचा बंदोबस्त करायचा कसा, त्यामुळे आमचे पुनर्वसन करा अशी मागणी करीत घोषणा पालिका मुख्यालया समोर दिल्या. आपली मागणी दुर्घटना इमारती मधील रहिवासी कुटुबियांनी करत, मृत्यू पावलेल्याना जाहीर केलेली शासन मदत तातडीने मिळावी. तसेच उपार झालेल्या, उपचार सुरू असलेल्याना तातडीने मदत द्यावी. तसेच पावसळा सुरू होण्यापूर्वी पुनर्वसन करावे अशी मागणी केडीएमसी मुख्यालया प्रवेशद्वारा समोर जमलेल्या दुर्घटना ग्रस्त कुटुंबायांच्या वतीने प्रसिद्धी माध्यामा समोर केली.

या प्रकरणी केडीएमसी आयुक्त यांच्या भेटीसाठी आपल्या मागण्या घेऊन गेलेल्या शिष्टमंडळाला अतिरिक्त आयुक्त यांनी शुक्रवारी सकाळी 11 वा.वेळ दिली. सप्तशृंगी इमारत दुर्घटना प्रकरणातील रहिवाशांचे दुखः यातना आणि उपस्थित कुटुंबीयांचे चेहऱ्यावरील रडू पाहता दुखः काय बितले आहे असे चित्र यानिमित्ताने दिसत होते.

# वसई विरार मनपाचे नवे अग्निशमन केंद्र कार्यान्वित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरव महामार्गालगतच्या परिसरात आग दुर्घटना व इतर आपत्कालीन परिस्थितीत अडचणी निर्माण होतात. अशा वेळी या भागात तातडीने मदत मिळावी यासाठी महापालिकेकडून वसई फाटा येथे नवीन अग्निशमन उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. पालिकेचे हे ८ वे उपकेंद्र आहे.

वसई विरार शहराच्या पूर्वेच्या भागातून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या महामार्गावर अग्निसुरक्षा व आपत्कालीन मदतीच्या दृष्टीने सुविधा नसल्याने अडचणी येत होत्या. याशिवाय मागील काही वर्षांपासून महामार्गालगतचा परिसर




हा वेगाने विकसित होऊ लागला आहे. औद्योगिक कारखाने, उपहार गृहे, गोदामे, बैठ्या चाळी इतर आस्थपना यामुळे हा परिसर ही अधिक दाटीवाटीचा बनला आहे. अनेकदा महामार्ग व त्या लगतच्या भागात कारखान्यांना आगी लागण्याच्या घटना घडतात. तर महामार्गावर काही वेळा चालत्या वाहनांना आगी, विचित्र अपघात, ऑइल गळती, गॅस गळती असे प्रकार ही घडतात.

अशा वेळी वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण केले जाते. परंतु सुरवातीला अस्तिवात असलेली अग्निशमन केंद्र शहरी भागाच्या व आतील भागात आहेत. त्यामुळे महामार्गावर आग दुर्घटना व इतर आपत्कालीन परिस्थिती निर्माण

झाल्यास महामार्गावर पोहचण्यास विलंब होत होता. काही वेळा घटनेची माहिती मिळाल्यानंतर वाहतुक कोंडी व दूरचे अंतर यामुळे अग्निशमन दलाचे वाहन पोहचण्यास अडचणी येत होत्या.

यासाठी आता महापालिकेकडून वसई विरार महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या महामार्गाजवळ नवीन अग्निशमन केंद्र तयार करण्याचा निर्णय घेतला होता.




# वीजपुरवठ्यात तांत्रिक बिघाड डोंबिवलीत आठ तास बत्ती गुल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. २२ :** पूर्वेतील दत्तनगर परिसरात तांत्रिक बिघाडाचा शोध न लागल्याने बुधवारी (ता. २१) रात्रभर वीजपुरवठा खंडित झाला होता. अचानकपणे आलेल्या सोसाट्याचा वारा आणि त्यासोबत मुसळधार पावसाने सगळ्यांचीच दाणादाण उडवली. पहाटे ३ वाजता दत्तनगर भागातील वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांच्या झोपेचे खोबरे झाले. गुरुवारी सकाळी १० वाजले तरी वीज न आल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला.

पूर्वेतील दत्तनगर, टंडन रोड परिसरात वर्षभरापासून वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत आहेत. यामुळे तेथील शेकडो रहिवासी त्रस्त आहेत. कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांचे जनसंपर्क कार्यालय या परिसरात आहेत, शिवाय त्यांचे सेकंड होमदेखील याच परिसरात आहे. ते तेथील माजी नगरसेवक आहेत. त्यामुळे ते काही करतील, अशी अपेक्षा नागरिकांना आहे, परंतु साडेचार महिन्यांत निवडून आल्यानंतर त्यांनीही या समस्येकडे पाठ फिरवल्याने नागरिकांत प्रचंड नाराजी पसरली आहे.

महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात नागरिक नाराज असून, डोंबिवलीत सर्वाधिक टक्का वीजबिल भरण्याचा असूनही येथील नागरिकांना अखंड वीजपुरवठा का होत नाही, असा प्रश्न नागरिकांना आहे. वीजबिल भरले नाही, तर क्षणाचा विलंब न लावता महावितरणचे कर्मचारी वीज कापतात, परंतु जे सातत्याने भरतात, त्यांना अखंड वीज का दिली जात नाही. अ दर्जा केवळ नावाला असल्याची टीका महावितरणवर केली जात आहे.

मंगळवारी (ता. २०) रात्रीदेखील पावसाचा शिडकावा होताच आगरकर रस्त्यावरील वीज खंडित झाली. त्यामुळे पावसाच्या धर्तीवर जी कामे करायची होती, ती वेळच्यावेळी महावितरणचे कर्मचारी करत नाहीत आणि करत असतील तरी समस्या का येतात. त्यामुळे जे वेळोवेळी शटडाऊन घेतले जाते, त्या काळात नेमकी काम केली जातात की नाही यावरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. दत्तनगर भागात वर्षभरापासून सतत वीजपुरवठा खंडित होतो, परंतु त्यावर कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com



# वसई विरारमध्ये अनधिकृत इमारतींवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : वसई विरारमधील 41 बेकायदेशीर इमारतीचा मुद्दा गाजला. इतक्या इमारती उभ्या झाल्या. त्यातील सदनिका विकल्या गेल्यावर ही जागा शासकीय असल्याचे अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. तोपर्यंत अर्थपूर्ण कानाडोळा करण्यात आला. हे प्रकरण राज्यात चांगलेच गाजले होते. बहुजन विकास आघाडी पार्टीचा माजी नगरसेवक सीताराम गुप्ता याच्यावर कारवाई झाली. आता या प्रकरणात गुप्तावर ईडीने छापेमारी केली आहे.

सीताराम गुप्तावर मनी लाँड्रिंगचा गुन्हा

बहुजन विकास आघाडी पार्टीचा माजी नगरसेवक सीताराम गुप्ता याने बेकायदेशीर इमारती उभ्या करून सामन्यांची फसवणूक केली. त्याच्यावर ईडीने गुन्हा दाखल केला. गुप्तावर मनी लाँड्रिंगचा गुन्हा झाला आहे. ईडीकडून वसई विरारमध्ये १३ ठिकाणी मोठे सर्च ऑपरेशन हाती घेण्यात आले आहे.

सीताराम गुप्ताने वसई विरार परिसरात ४१ बेकायदेशीर इमारती उभ्या करून लोकांना घरे विकली. कोर्टाकडून ह्या इमारती बेकायदेशीर ठरवल्यानंतर वसई विरार महानगरपालिकेने पाडल्या. यामुळे जवळपास अडीच हजार लोक बेघर झाली आणि त्यांची आर्थिक फसवणूक झाली. ईडीने याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून आता सर्च ऑपरेशन सुरू आहे.

काय आहे प्रकरण ? : अग्रवाल, वसंत नगरी परिसरातील सर्व्हे क्रमांक 22 ते 30 मधील भूखंडासंबंधीचे हे प्रकरण होते. यातील काही जमीन ही डंपिंग ग्राऊंड आणि एसटीपी प्लँटसाठी राखीव होती. तर काही जमीन इतर माणसाच्या नावावर होते. 2006 मध्ये या जमिनीवर सीताराम गुप्ताने कब्जा केला होता. त्यानंतर या जमिनीवर त्याने इमारत उभारली. 2010-12 मध्ये येथे चार चार मजली 41 इमारती उभ्या राहिल्या. सीतारामने त्यातील फ्लॅट विक्री केले. तोपर्यंत मनपातील अधिकारी अर्थपूर्ण साखर झोपेत होते. पण मूळ मालकाने जेव्हा कोर्टात धाव घेतली. कोर्टाचा दट्ट्या बसला तेव्हा मनपा अधिकाऱ्यांची झोप उडाली आणि कारवाई झाली.

# हिवताप, डेंग्यू, साथरोग विषयक जाहीर जनजागृती शिबिरांचा नागरिकांनी घेतला लाभ



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप / डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत 26 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रांतर्गत पावसाळा कालावधीत प्रत्येक आठवड्याला एक दिवस विशेष हिवताप / डेंग्यू जनजागृती शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. शिबिरांना भेटी दिलेल्या नागरिकांमध्ये हिवताप / डेंग्यू व साथरोगाबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

येणारा पावसाळा कालावधी लक्षात घेता दिनांक 16 ते 21 मे 2025 या कालावधीत 26 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या क्षेत्रात वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत कार्यक्षेत्रातील खाजगी वैद्यकिय व्यावसायिक व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील सर्व कर्मचाऱ्यांची सभा घेण्यात आली. या सभेमध्ये खाजगी वैद्यकिय व्यावसायिक यांनाही पाचारण करून हिवताप / डेंग्यू नियंत्रणाबाबत बनविलेली ध्वनीचित्रफित दाखवण्यात आली. हिवताप / डेंग्यू, साथरोग अशा आजाराचे रुग्ण महानगरपालिकेस तात्काळ कळविण्याबाबत सूचित करण्यात आले. त्याचप्रमाणे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामधील सर्व कर्मचाऱ्यांना पावसाळा कालावधीमध्ये सतर्क राहण्याबाबत सूचित करण्यात आले.

याप्रमाणे नमुंमपा कार्यक्षेत्रात जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचून जनजागृती करण्याकरिता दि. 22 मे 2025 रोजी 26 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत विविध ठिकाणी जाहीर शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरांमध्ये 10,021 नागरिकांनी भेट दिली असून, 647 रक्तनमुने घेण्यात आले आहेत.

सदर शिबिरांचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये ॲनॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून, तसेच नागरिकांना डासांच्या आळया प्रत्यक्ष दाखवून तसेच पाणी साठवून ठेवलेले ड्रम हे ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याबरोबरच घराभोवती व घरांतर्गत असणा-या डासोत्पत्ती स्थानांची माहिती करून देणे, पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे तसेच आठवड्यातून एक दिवस त्या स्वच्छ करुन कोरड्या ठेवणे, भंगार साहित्य व टायर्स इ. नष्ट करणे, छतावरील प्लास्टीक शिट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे व ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे, त्याचप्रमाणे घर व परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी उकळून पिणे, भाजीपाला स्वच्छ धुवून वापरणे, उघडयावरचे अन्न खाणे टाळणे याबाबत नागरीकांना अवगत करुन आवाहन करण्यात आले.

आरोग्य विभागाच्या अशा कार्यवाही सोबतच नवी मुंबईकर नागरिकांनी घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणे तसेच आपले घर व परिसर स्वच्छ ठेवणे, आजुबाजूचा परिसर / टेरेसवरील भंगार नष्ट करणे आदी बाबींवर लक्ष दिले तर नवी मुंबईत हिवताप / डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल. तरी सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी यामध्ये संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# भिवंडी तालुक्यात अवकाळीमुळे शेतकरी चिंताग्रस्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : एकीकडे मान्सूनपूर्व पावसाने महाराष्ट्र राज्यासह अनेक राज्यांना चांगलाच तडाखा दिला आहे. दुसरीकडे या अवकाळी पावसाने रब्बी हंगामाच्या भातशेतीसह भाजीपाला लागवडीची नासधूस केली आहे. त्यातच भातशेतीचा खरीप हंगामही जवळ येऊन ठेपला आहे. त्यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या निर्देशानुसार या वर्षीचा मान्सून राज्यात लवकरच दाखल होणार आहे, परंतु मागील दोन वर्षांपासून ऐन मान्सूनमध्ये वरुणराजाने दडी मारल्याचे दिसून आले. तर या वर्षी ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस चांगलाच कोसळत आहे. काल मंगळवारी सायंकाळी विजेच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटांसह काही वेळ मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. कारण सद्यस्थितीत सुरू असलेल्या पावसाने ऐन खरीप हंगामातील मान्सूनमध्ये म्हणजे जून महिन्यात दडी मारल्यास शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जाण्याची भीती स्पष्ट होत आहे. तसेच जूनमध्ये अतिवृष्टी झाल्यास भातपीक वाहून गेल्यास शेतकऱ्यांना प्रचंड नुकसानीला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सद्यस्थितीत खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पावसाचा लपंडाव पाहता शेती मशागतीच्या कामांना पूर्णविराम लावल्याचे दिसून येत आहे. तसेच शेती कामाकरीता लागणाऱ्या मजुरांची मजुरी वाढल्याने भातशेतीचे पीक घेण्यासाठी धाडस न केल्याने शेतीचा टक्काही घसरला आहे. दरम्यान भिवंडी तालुका कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, भिवंडी तालुक्यात भातपिकाचे क्षेत्रफळ १६६८९ हेक्टर आहे. आताही भातपिकाचे तितकेच क्षेत्रफळ आहे. यामध्ये हळव्या भात प्रकाराची शेती ४१७२.२५ हेक्टर क्षेत्रात होत आहे. निमगरवा शेती ९१७८.९५ हेक्टर क्षेत्रात आणि गरवा शेती ३३३४.८० क्षेत्रात होत आहे. भिवंडी तालुक्यातील एकूण रोपवाटिका क्षेत्र १६६८.९० हेक्टर इतकी असून या वर्षी भातशेतीचा टक्का मोठ्या प्रमाणात होईल असा अंदाज कृषी विभागाने वर्तवला आहे. दुसरीकडे हवामान विभागाच्या मान्सूनच्या अंदाजाने शेतकऱ्यांना यावर्षी सुगीचे दिवस येणार असल्याचे दिसून येत असले तरी वास्तविक कसा आणि किती प्रमाणात पाऊस पडणार हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे बळीराजावर यंदाही दुबार पेरणीचे संकट ओढवणार का? असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

# आयटीआय विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांत भरघोस पगाराच्या नोकऱ्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : ठाणे येथील शासकीय तंत्रनिकेतन ठाणे या नामांकित व शासकीय अनुदानित, संस्थेत यंत्र, स्थापत्य, केमिकल अभियांत्रिकी, कॉम्प्युटर इंजिनियरिंग, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, ट्रॅव्हल टुरिझम या विविध विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना मुंबई, ठाणे, पुणे, अंबरनाथ, महापे, महाड, पातळगंगा, भिवंडी येथील औद्योगिक कंपन्यांमध्ये उच्च पगाराचे प्लेसमेंट मिळाले आहेत.

या संस्थेत गोदरेज, रिलायन्स, टेक्निप एनर्जी, आदित्य बिर्ला, एसबी इंटरनॅशनल, श्री ललिता, टाटा मोटर्स, कल्पतरू, शहापूर पालमजी, जी ई एरोस्पेस पुणे, सीएट अंबरनाथ, संत गोबीन, वरली इंडिया, आनंद ग्रुप पुणे, दिल्ली मेट्रो इत्यादी कंपन्यांमध्ये कॅम्पस प्लेसमेंटद्वारे ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

कॅम्पस प्लेसमेंटद्वारे विद्यार्थ्यांना साधारण अडीच ते साडेचार लाख प्रति वर्ष पॅकेज मिळाले आहे. संस्थेतील यंत्र विभागातील वेदांत पाटील या विद्यार्थ्यास टाटा मोटर्स या कंपनीमार्फत नोकरी तसेच शिक्षणाची संधी कमवा व शिका या आगळया वेगळया कमवा आणि शिका या योजनेंतर्गत मिळाली आहे. या विद्यार्थ्यास बिट्स पिलानी या नामांकित संस्थेद्वारे बी टेक पूर्ण करण्याची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्यासाठी प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी व या विभागामार्फत विद्यार्थ्यांकरिता विविध प्रकारचे मार्गदर्शन दिले जाते. जसे की रिझ्युम रायटिंग, मुलाखतीसाठी तयारी, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, रोजगाराच्या संधी यासाठी विविध विभागातर्फे व प्लेसमेंट विभागातर्फे विशेष प्रयत्न केले जातात. तसेच दिल्ली मेट्रो अंतर्गत मुंबई मेट्रोसाठी संस्थेतील साधारण सोळा विद्यार्थ्यांना मुंबई मेट्रोसाठी निवड करण्यात आली आहे.

# वनविभागाचे सौंदर्यीकरण,सशक्तीकरण आणि मजबुतीकरणावर विशेष भर

## – वनमंत्री गणेश नाईक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




रायगड : वनपरिक्षेत्र अधिकारी, माथेरान कार्यालय व तपासणी नाका या नूतन इमारतीचे उदघाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते आज करण्यात आले. वनमंत्री या नात्याने वनविभागाचे सौंदर्यीकरण, सशक्तीकरण आणि मजबुतीकरण करण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

कर्जत येथील माथेरान वन क्षेत्रपाल कार्यालय आणि शेलू येथील तपासणी नाका यांचे उद्घाटन सोहळयास आ.महेंद्र थोरवे ,राज्याचे प्रधान सचिव वन बाल प्रमुख शोमिता विश्वास, मुख्य वन संरक्षक ठाणे के प्रदिपा, उप वनसंरक्षक राहुल पाटील, प्रांताधिकारी प्रकाश संकपाल, पनवेल माजी नगराध्यक्ष सुनील घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, माझे वन ही शासनाची नाविन्यपूर्ण योजना असून या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक रेंजमध्ये सुरंगी आणि बहाडोली या जांभळाच्या जातीची झाडे 100 एकर मध्ये लावा. या योजनेमध्ये प्रत्येक कार्यरत वन कर्मचारी यांनी वन विभागाचे कार्यक्षेत्रातील वनांपैकी कोणतेही 1 एकर क्षेत्राची निवड करुन सन 2025 चे पावसाळयांत, स्वेच्छेने व स्वखर्चाने त्यांच्या पसंतीच्या वृक्षांची लागवड करावयाची आहे. तसेच निश्चित केलेल्या क्षेत्रातील वृक्षांचे संपूर्ण संरक्षण व संगोपन करण्याचे आहे. या योजनेंतर्गत वनीकरण केल्यास एकूण कार्यरत पदांप्रमाणे साधारणतः 338 एकर क्षेत्रावर सन 2025 चे पावसाळयात वनीकरण होणार आहे. "माझे वन" योजनेमुळे वनीकरणावर वैयक्तिक दृष्ट्या लक्ष दिले जाणार असल्याने, अवनत वनांचे वनीकरण होऊन वृक्षाच्छादन वाढण्यास भरीव मदत होणार आहे. असा विश्वास श्री. नाईक यांनी यावेळी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले पारंपरिक रस्ते आहेत त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अडथळे वन विभाग आणणार नाही आणि ते रस्ते डांबरीकरण केले जाईल. संयुक्त वन व्यवस्थापन ही योजना माझ्या कार्यकाळात सुरू झाली. त्यातून जंगले वाढली आहेत. कर्जत तालुक्यात वन उद्यान उभारण्यासाठी लागणारा आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला जाईल असेही त्यांनी सांगितले. वन जमीन 21 टक्के असून माझ्या काळात पाच टक्के जमीन वाढवली जाईल असे शब्द दिला असून वन खात्यात बदली करण्यासाठी माझ्याकडे थेट या आणि कोणाचीही मध्यस्थी करू नका अशी सूचना त्यांनी वन कर्मचारी यांना केली. मोरबे धरण मधील प्रकल्पग्रस्त यांना नोकऱ्या देण्यासाठी प्रयत्नशील असून भविष्यात पोशीर धरण होत असल्याने त्यांना देखील नवी मुंबईत नोकरी देणार आहोत असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. कर्जत आणि नेरळ या वाढवणाऱ्या वस्तीसाठी पाण्याची स्वंतत्र व्यवस्था करावी अशी सूचना मंत्रिमंडळ बैठकीत केली असून शासनाने त्याची नोंद घेतली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार महेंद्र थोरवे यांनी राज्यमार्ग 76 वरील काही ठिकाणी वन विभागाने रस्त्यांची कामे थांबली आहेत.कर्जत हे ग्रीन कर्जत हब व्हावे यासाठी कर्जत मध्ये सुंगांधी झाडे लावावीत अशी मागणी यावेळी केली.

वन विभागाच्या राज्याचे प्रधान वन बल प्रमुख शोमीता विश्वास यांनी वन संरक्षण समिती यांचा जंगल राखण्यासाठी मोठा सहभाग राहिला असून ए आय तंत्रज्ञानाची मदत घेऊन वन वणवे रोखण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे सांगितले तसेच माझे वन ही संकल्पना भविष्यात संपूर्ण राज्यात राबविण्यासाठी वन विभाग धोरण निश्चित करेल असे सांगितले.

यावेळी जागतिक दर्जाच्या ब्लू फ्लॅग प्रमाणपत्रसाठी नागाव ग्रामपंचायत आणि वनविभाग यांच्या मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. तसेच एआय तंत्रज्ञानसाठी युनिव्हर्सल बिझनेस स्कूल बरोबर सामंजस्य करार करण्यात आला.

उप वनसंरक्षक राहुल पाटील यांची संकल्पना असलेल्या माझे वन या योजनेचे लोकार्पण वनमंत्री यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. तसेच वनसंरक्षण आणि वनसंवर्धन यामध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी केले. यावेळी त्यांनी अलिबाग वनविभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची आणि माझे वन यासंकल्पनेबद्दल माहिती दिली.

# बेकायदा धाब्यांकडून शासकीय नियमांची पायमल्ली

## पोलीस,अन्न औषध प्रशासनाचे दुर्लक्ष




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


भिवंडीः शहरालगत असलेल्या मुंबई-नाशिक महामार्गावर मोठ्या प्रमाणात धाबे निर्माण झाले असून या धाब्यांवर जेवण करण्यासाठी नागरिक आपल्या परिवारासह नेहमीच गर्दी करीत असतात. भिवंडीसह लगतच्या ठाणे, कल्याण, मुंबई, मुंब्रा परिसरातील नागरिक येथील धाब्यांवर जेवणासाठी येतात. मात्र शासकीय नियमांना पायदळी तुडविणाऱ्या हे धाबे दिवस रात्र सुरू ठेवून शासकीय नियमांची पायमल्ली करणाऱ्या थाबा चालकांकडे पोलीस प्रशासनासह अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. त् यामुळे धाब्यांवर हाणामारीच्या घटना रात्री अपरात्री घडत आहेत. वहपा येथील शालीमार ढाब्यावर जेवणासाठी आलेल्या दोन ग्राहकांमध्ये झालेल्या किरकोळ कारणावरून दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याची घटना शनिवारी रात्री उशिरा घडली आहे. 10000 भविष्यात धावे चालकांच्या या मनमानी कारभारामुळे तसेच पोलिसांच्या दुर्लक्षितपणामुळे शहराची सुरक्षा धोक्यात येण्याची शक्यता त्यामुळे वर्तवली जात आहे. मुंबई-नाशिक महामार्गावरील मानकोली पासून पडघ्यापर्यंत मोठ्या प्रमाणात धाबे रस्त्या लगत आहेत. तसेच भिवंडी वाडा, भिवंडी-कल्याण, भिवंडी-वसई या महामार्गावर देखील मोठ्या प्रमाणात धावे थाटण्यात आले असल्याने या धाब्यांवर देखील नागरिक मोठी गर्दी करत आहेत. विशेष माणजे मुंबई ठाणे येथील धाब्यांच्या तुलनेन भिवंडीतील याच्यांवरील जेवणाचे बिल चार शहरातील हॉटेल धाबा यांच्यमानाने स्वस्त आणि कमी असल्याने नागरिक भिवंडीतील धान्यांवर जेवणासाठी येतात. या परिसरात सुमारे ५० हुन अधिक धाबे महामार्गावर आहेत. भिवंडीतील धाबे पहाटेपर्यंत सुरू असतात, पोलिसांकडून त्यांना अभय दिले जात असल्याचा आरोप आहे.

# मुरबाड माळशेज घाटात पहाटेच्या सुमारास दरड कोसळली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड कल्याण राष्ट्रीय महामार्गावर २२मे२०२५ रोजी पहाटे ४.३० सुमारास माळशेज घाटात रस्त्यालगत दरड कोसळली ,, कोणत्या प्रकारची जी काही घडली नाही
राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकाम विभागच्या पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केल्यानंतर तात्काळ दरड बाजूला करण्यात आली आहे.





**तात्काळ दरड बाजूला करून वाहतूक सुरळीत चालू!**

घाटात पावसाचा अंदाज बघूनच जेसीब इतर साहित्य मशिनरी तैनात करण्यात आले आहे अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग बांधकाम मुरबाड उपविभागाचे उप अभियंता धनाजी टिले यांनी दिली आहे. कोणतीही जीवित अथवा इतर हानी झालेली नाही. वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभाग मुरबाड यांनी दिली आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. / B.Com. / B.Sc. CHEMISTRY / B.Sc. MATHS / BAF / BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY / M.Com. ADVANCED ACCOUNTANCY / M.A. MARATHI / M.A. ECONOMICS / M.A. SOCIOLOGY / M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# टेंभीनाक्यावर शिवसेनेच्या माजी नगरसेवकावर चॉपरने हल्ला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**एक गंभीर जखमी**
**परिसरात खळबळ**

ठाणे: टेंभी नाका येथे शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक सुधीर कोकाटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी चॉपरसारख्या दिसणाऱ्या हत्याराने हल्ला चढवला. या हल्ल्यात कोकाटे हे बचावले असून त्यांचे मित्र गजानन म्हात्रे हे गंभीररित्या जखमी झाले आहेत. सुधीर कोकाटे यांच्या तक्रारीवरून आफरीन खान, हानिफ आणि अन्य अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल झाला असून पोलीस त्या हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

सोमवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास तक्रारदार कोकाटे, किशोर गायकर, जखमी गजानन म्हात्रे, प्रसाद कांबळे, मोरे व इतर जण टेंभीनाक्यावरील नवरात्र कार्यालयासमोर कामानिमित्त बसले होते. त्याचवेळी अचानक एक रिक्षा आणि दुचाकी येऊन तेथे थांबली. दुचाकीवरून उतरलेल्या आफरीन हिच्या सांगण्यावरून रिक्षांतून तोंडाला रुमाल बांधलेल्या दुकलीने चॉपरसारख्या दिसणाऱ्या हत्याराने हल्ला चढवला. या हल्ल्यात कोकाटे बचावले असून त्यांचे सहकारी म्हात्रे यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारार्थ ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024